


दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (चोंडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २३६ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.२ जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी मुख्यमंत्री फडणवीसांचे विश्वासू रवींद्र चव्हाण

## कोणीही अर्ज न भरल्यामुळे बिनविरोध निवड,ठरले पक्षाचे बारावे प्रदेशाध्यक्ष

**मुंबई (वृत्तसंस्था)–गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरु असलेल्या महाराष्ट्राच्या भाजप प्रदेशाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे आमदार रवींद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. मुंबईत आयोजित विशेष कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी निरीक्षक असलेले केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, विनोद तावडे यासह भाजपचे सर्व आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू नेते म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पार्टी यांच्या विचारधारेचे संस्कारही त्यांच्यावर आहेत.यावेळी आशिष शेलार म्हणाले, रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे भाजपचे नावाने बारावे अध्यक्ष असतील. मात्र ते विरोधकांचे राजकीय तेरावे घालतील, विरोधकांचे बारा वाजवल्याशिवाय राहणार नाही.मुंबई महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद अशा विविध स्तरांवरील निवडणुका तोंडावर आहेत. या निवडणुकांत जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून आणून भाजपला यश मिळवून देण्याची मोठी जबाबदारी आता चव्हाण यांच्यावर असणार आहे.**

रवींद्र चव्हाण हे डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. ते २००९ पासून सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. अलीकडच्या निवडणुकीत तब्बल ५० हजारांहून अधिक मताधिक्य मिळवत विजयी झाले होते. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये ते कॅबिनेट मंत्री झाले होते. त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली.रवींद्र चव्हाण यांच्याकडे भाजपने २००२ साली कल्याण उपजिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली होती. २००५ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करत कल्याण–डोंबिवली महापालिकेत नगरसेवक झाले होते. २००७ मध्ये ते स्थायी समितीचे सभापती झाले. २००९ साली कल्याण विधानसभा मतदारसंघाचे विभाजन होऊन डोंबिवली हा स्वतंत्र मतदारसंघ तयार झाला. त्यानंतर झालेल्या प्रत्येक विधानसभा निवडणुकीत रवींद्र चव्हाण यांनी वर्चस्व मिळवले आणि मोठा विजय देखील मिळवला. त्यानंतर २०१६ साली त्यांना राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आमदारकी मिळवण्याची हॅटट्रीक पूर्ण केली.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये महाराष्ट्र भाजप प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यभार हाती घेतला. ओबीसी चेहरा असणाऱ्या बावनकुळेंच्या नेतृत्वात पक्षाने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तब्बल १३२ जागा जिंकून अभूतपूर्व यश मिळवले. बावनकुळे यांनी भाजपची स्थानिक पातळीवरील रचना मजबूत केली. १.५ कोटी नवीन प्राथमिक सदस्य व ५ लाख सक्रिय कार्यकर्ते जोडण्यात यश मिळवले. बूथ स्तरापासून ते जिल्हा पातळीपर्यंत संघटनात्मक निवडणुका आणि नियुक्त्यांचे नियोजन केले. यामुळेच लोकसभा निवडणुकीत भाजपला केवळ ९ जागा मिळाल्या असल्या तरी, बावनकुळेंनी त्यातून धडा घेऊन विधानसभा निवडणुकीत बूथस्तरीय व्यवस्थापन करून भाजपला यश मिळवून दिले.



### या सरकारचं करायचं काय? खाली डोकं,वर पाय!

# विधिमंडळात विरोधकांचा गोंधळ नाना पटोले एक दिवसासाठी निलंबित

**मुंबई । विराम पवार**

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाचा दुसरा दिवस प्रचंड गदारोळात गेला. काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर त्यांना एक दिवसासाठी निलंबित करण्यात आले. त्यांच्या निलंबनाच्या निर्णयानंतर विरोधकांनी तीव्र घोषणाबाजी करत सभागृहात जोरदार आंदोलने केली. या सरकारचं करायचं काय? खाली डोकं, वर पाय!, शेतकऱ्यांची माफी मागा! अशा घोषणा देत विरोधकांनी सभात्याग केला. नाना पटोले, विजय वडेट्टीवार यांच्यासह काही आमदार थेट अध्यक्षांच्या आसनासमोर जाऊन आंदोलनात सहभागी झाले.विरोधकांनी बबनराव लोणीकर आणि माणिकराव कोकाटे यांच्या विधानांचा निषेध करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात शेतकऱ्यांची माफी मागावी, अशी जोरदार मागणी केली.



नाना पटोले म्हणाले, या सरकारचे नेते सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. हा अपमान शेतकरी सहन करणार नाही. मोदी तुमचे बाप असतील, पण शेतकऱ्यांचे नव्हेत. मुख्यमंत्री माफी मागा आणि दोषींवर कारवाई करा.या वादानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाना पटोले यांच्या असंसदीय वर्तनाचा उल्लेख करत त्यांना एका दिवसासाठी निलंबित केले. यामुळे संतप्त झालेल्या विरोधकांनी अधिक आक्रमक पवित्रा घेतला आणि संपूर्ण दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.

विरोधकांनी शेतकरी आत्महत्या, कर्जमाफी, महिला अत्याचार, विद्यार्थ्यांचे प्रश्न, कायदा–सुव्यवस्था आदी मुद्द्यांवर सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. प्रश्नोत्तराच्या सत्रानंतरच वातावरण तापले आणि कार्यवाहीला वारंवार व्यत्यय आला.नाना पटोले यांचे निलंबन, मुख्यमंत्र्यांवर आरोप आणि विरोधकांचा तीव्र पवित्रा हे सर्व आगामी राजकीय वादळाची नांदी असल्याचे स्पष्ट संकेत देत आहे. सभागृहाच्या मर्यादा ओलांडणारी भाषा आणि सत्ताधाऱ्यांचे मौन, यामुळे जनता नेमकं कुणावर विश्वास ठेवावा, हाच मोठा प्रश्न आहे.

# डोंगरावर चौक ते आंबेडकर चौक रस्त्याची दुरवस्था

### युवासेनेचे निवेदन व मुख्याधिकाऱ्यांशी थेट संवाद

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा शहरातील डोंगरावर चौक ते आंबेडकर चौक दरम्यानचा रस्ता पावसामुळे पूर्णतः खराब झाला असून, या रस्त्यावर तातडीने डांबरीकरण करावे, अशी मागणी युवासेनेच्या वतीने नगर परिषद प्रशासनाकडे करण्यात आली आहे.युवासेनेचे तालुकाप्रमुख प्रणय पारेलवार यांनी युवासेनेचे जिल्हाप्रमुख आलेख रट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. विशेष म्हणजे, या विषयाची गंभीरता लक्षात घेऊन जिल्हाप्रमुख आलेख रट्टे यांनी थेट फोनवरून मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधत सदर रस्त्याची स्थिती व नागरिकांना होणाऱ्या त्रासाची माहिती दिली.

या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, शालेय विद्यार्थी व वाहने ये–जा करतात. पावसामुळे पडलेले खड्डे आणि रस्त्याची दुरवस्था यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. तसेच या भागात दरवर्षी मोहरमसारख्या मोठ्या सणांचे आयोजन होते, ज्या वेळी मोठी गर्दी जमते. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण



आवश्यक आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# अरुणभाऊ अडसड यांच्यामुळे विदर्भात कमळ फुलण्यास सुरुवात-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह विविध मंत्र्यांचे शुभेच्छा; दिव्यांगांना तीन चाकी सायकल वाटप

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

विपरीत परिस्थिती, आणीबाणीचा काळ आणि सात दशकांचा संघर्ष... अशा कठीण वाटचालीतून विदर्भात भारतीय जनता पक्षाला आधार देणारे, कार्यकर्ते घडविणारे अरुणभाऊअडसड हे नेतृत्व आजच्या यशस्वी भाजपचे आधारस्तंभ ठरले, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. अरुणभाऊंच्या पराक्रमी प्रयत्नांमुळेच विदर्भात कमळ फुलण्यास सुरुवात झाली, असे सांगत त्यांनी अरुणभाऊंना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.भाजपाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार अरुणभाऊ अडसड यांचा वाढदिवस धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे व मंगरूळ दस्तगीर या तीनही तालुक्यांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. मंगरूळ दस्तगीर येथे महाआरती, चांदूर रेल्वे येथे रक्तदान शिबिर तर धामणगाव रेल्वे येथील अरुणोदय निवासस्थानी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा महिला आघाडीच्या वतीने अरुणभाऊ आणि त्यांच्या पत्नी प्रतिभाताई अडसड यांना औक्षण करून शुभेच्छा देण्यात आल्या. दिवसभर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी भाजपसह विविध पक्षांचे



कार्यकर्ते, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, सरपंच, उपसरपंच, अधिकाऱ्यांची एकच रीघ लागली होती.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सचिव, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच राज्यातील अनेक मंत्री व आमदारांनी शुभेच्छा दिल्या.गौण खनिज निधीच्या माध्यमातून तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना तीन चाकी सायकल वाटपाचा कार्यक्रम देखील या निमित्ताने आयोजित करण्यात आला. माजी अध्यक्ष अरुणभाऊ अडसड यांच्या हस्ते या सायकलींचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला आमदार प्रताप अडसड, तहसीलदार अभय घोरपडे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी योगेश वानखडे, विस्तार अधिकारी निलेश वाघ, भाजपाचे स्थानिक पदाधिकारी, तसेच अरुणभाऊंवर प्रेम करणारे विविध पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.ही संपूर्ण घटना केवळ वाढदिवसाचा कार्यक्रम नसून, अरुणभाऊंच्या जीवनातील कार्यगौरवाचा सार्वजनिक सन्मान असल्याचे चित्र दिसून आले.

# दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या युवकाकडून देशी कट्टा व काडतूस जप्त



**मुल । प्रतिनिधी**

दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या युवकास मुल पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून देशी बनावटीचे कट्टा, दोन जिवंत काडतूस, दोन मॅगझीन आणि एक मोटारसायकल असा सुमारे १ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ३० जून रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव गौतम नितीन नरुले (वय २६), रा. वॉर्ड क्र. १२, मुल असे आहे.

मुल पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक शहरात गस्त घालत असताना महाबीज केंद्राजवळ, मुल ते ताडाळा रस्त्यालगत संशयास्पद स्थितीत मोटारसायकलवर असलेल्या युवकाची तपासणी केली असता त्याच्याकडे परवानगीशिवाय देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल, दोन जिवंत काडतूस, दोन मॅगझीन आढळून आले. हे शस्त्र तो बेकायदेशीररीत्या बाळगत असल्याचे निदर्शनास आले.प्राथमिक तपासात आरोपी भविष्यात गंभीर स्वरूपाचा दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट झाले असून, तो नागरिकांमध्ये दहशत निर्माण करून जिवीतास धोका पोहोचविण्याच्या उद्देशाने फिरत होता, असे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी मुल पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २३५/२०२५, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत कलम ३/२५ व ७/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार आत्राम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व उपविभागीय पोलिस अधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली, मुल पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सुबोध वंजारी यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत सपोनि अमितकुमार आत्राम, पो.नि. भाऊराव बोरकर, पो.ह.वा. भोजराज मुंडरे, जमीरखान पठाण, नापोअं विमाजी देवकते, पंकज बगडे, पोअं नरेश कोडापे, पोअं शंकर बोरसरे यांचा सहभाग होता.

# सोलापूरच्या नाभिक बांधवांकडून वारकऱ्यांसाठी मोफत दाढी-कटिंग सेवा

## गजानन महाराज पालखी निमित्त सेवाभावी उपक्रमाला हजारो वारकऱ्यांचा लाभ






**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

सोलापूर नाभिक दुकानदार बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गजानन महाराज पालखी सोहळ्याच्या निमित्ताने हजारो वारकऱ्यांना मोफत दाढी व कटिंग सेवा पुरविण्यात आली. सोमवारी, ३० जून रोजी अब्दुलपुरकर मंगल कार्यालय, सात रस्ता येथे सकाळी ९ वाजल्यापासून सुरू झालेल्या या उपक्रमात सोलापूर शहरातील सुमारे ८० नाभिक बांधव सहभागी झाले होते.सेवेस प्रारंभ संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. हे पूजन दिगंबर भालेकर व रुक्मिणी भालेकर यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मार्गदर्शक रामभाऊ डिगे, पांडुरंग चौधरी, वैभव शेटे, विजय माने, संतोष धोत्रे, संजय चिखले, ॲड. विकास तिरेकर, गणेश वाघमारे, गणेश दळवी हे मान्यवर उपस्थित होते.

सलून साहित्य श्री गणेश मार्केटिंगच्या मालकीण सुलोचना भाकरे आणि नलावडे यांनीही उपक्रमाला साहित्य व फोम पुरवून सहकार्य केले.उपक्रमाचे आयोजन सोलापूर नाभिक समाज अध्यक्ष प्रभाकर भालेकर, उपाध्यक्ष बापूराव काळे, शरनू हडपद, सचिव श्रीकांत राऊत, खजिनदार संतोष राऊत, सहसचिव प्रकाश शिंदे, कार्याध्यक्ष भारत शिंदे, प्रसिद्धीप्रमुख सचिन चौधरी, संचालक मनोज डिगे, प्रभाकर राऊत, आनंद वाघमारे, सिद्धाराम हडपद, सोमनाथ हळदे आदींनी केले होते.या मोफत सेवेत राऊत धोंडीबा, विभुते गणेश, वाघमारे बाळासाहेब, वाळके दिनेश, विभुते बापूराव, प्रभाकर राऊत, केशव राऊत, गणेश राऊत, संजय चिखले, गणेश चौधरी, दिलीप कोरे, भीमाशंकर कोरे, विष्णुपंत शिरसागर, अनिल राऊत, भीमाशंकर राऊत, श्रीधर भुसारे, अमोल गोरे, सुरेश कोरे, विश्वास कोरे, विक्रम राऊत, सुभाष काळे, सुरेश राऊत, चंद्रकांत राऊत, मल्लिनाथ लोखंडे, महादेव पवार, ओम पवार, आनंद चौधरी, श्रीराम वाघमारे, संतोष धोत्रे, आनंद वाघमारे, रामलू कोंढूर, रामदास राऊत, ज्ञानेश्वर वाघमारे, दिनेश विभुते, श्रीधर अवधुवंती, श्रीकांत राऊत, प्रकाश शिंदे, संतोष राऊत, मनोज डिगे, भारत शिंदे, अध्यक्ष प्रभाकर राऊत इत्यादींनी मन:पूर्वक सेवा बजावली. वारकऱ्यांनी या सेवेस भरभरून प्रतिसाद दिला असून, या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बदलापुरातील कवट्याचीवाडी अजूनही मूलभूत सुविधांपासून वंचित

## स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण...तरीही चिखल तुडवतच ग्रामस्थांचा प्रवास



### रोजच्या जगण्यातील संघर्ष

- रस्त्याअभावी शाळकरी मुलांचे शैक्षणिक नुकसान
- महिलांना डोंगर उतरत पाण्यासाठी तासंतास कसरत
- चिखलातून चालताना अपघातांची शक्यता
- रुग्णवाहिकेला वाडीपर्यंत पोहोचता न येणे

**बदलापूर । प्रतिनिधी**

देश स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाली, पण बदलापुरातील कवट्याचीवाडी आणि परिसरातील आदिवासी वाड्या अजूनही रस्त्यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. टोलेजंग इमारती आणि नागरी सुविधांमुळे प्रसिद्ध असलेल्या बदलापुरात आदिवासींच्या या वाड्यांमध्ये गेल्यावर मात्र दुर्दैवाचे वास्तव समोर येते.

शंभरहून अधिक घरांची वस्ती असलेल्या कवट्याचीवाडीतील ग्रामस्थांना आजही चिखल तुडवत प्रवास करावा लागतो. पावसाळ्यात रस्त्याचा अवघडपणा अधिकच वाढतो. विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी व महिलांना पाण्यासाठी डोंगर उतरून खाली यावे लागते. रुग्णवाहिका पोहोचू शकत नाही, त्यामुळे गरोदर महिलांच्या जीवितास धोका निर्माण होतो.

स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा प्रशासन व लोकप्रतिनिधींकडे रस्त्याची मागणी केली. मात्र, निवडणुकीवेळी दिली जाणारी आश्वासने निवडणुकीनंतर धुळीस मिळतात, असा आरोप ग्रामस्थ करत आहेत. या वाडीतील बहुतांश नागरिक कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेचे करदाता असूनही त्यांना रस्त्याचा, पिण्याच्या पाण्याचा किंवा आरोग्य सुविधांचा लाभ मिळत नाही.या सर्व समस्यांमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. आमच्या पिढ्या हाच त्रास सहन करत आहेत. आम्ही भोगतो आहोत ते आमच्या मुलांनी का सहन करावं? असा सवाल करत ग्रामस्थांनी प्रशासनाकडे त्वरित रस्ता आणि पाण्याची सोय करून देण्याची मागणी केली आहे.

# मीमाझी बायको माझी मेव्हणी लघुपट म्हणजे हास्याची मेजवानी-ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले

**पाथर्डी । वजीर शेख**

तृप्ती फिल्मचे निर्माते रामदास राऊत यांच्या निर्मितीतील माझी बायको माझी मेव्हणी या विनोदी लघुपटाचे चित्रिकरण पुण्यातील नरके पॅलेस हेवन पार्क व ज्ञानाई फाऊंडेशन कला साहित्य विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले.चित्रिकरणाच्या सुरुवातीस श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीपूजन व कॅमेऱ्याची पूजा ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, ज्ञानाई फाऊंडेशनचे अध्यक्ष लोककवी सीताराम नरके आणि निर्माते रामदास राऊत यांच्या हस्ते करण्यात आली.



कथानकात आजारी आईला भेटण्यासाठी तिच्या दोन मुली नवऱ्याला घेऊन माहेरी येतात आणि मग घरात एक मजेशीर योजना आखली जाते. ही योजना नेमकी काय असते? तिचा फायदा कोणाला होतो? हे सर्व पाहणे म्हणजे हास्याचा मनमुराद अनुभव आहे.या लघुपटात एकूण २८ कलाकारांना अभिनयाची संधी मिळाली आहे. सर्वांनी आपापल्या भूमिका जिवंत करण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे. कलाकारांमध्ये सुनील गोडबोले, रामदास राऊत, विशाल ससाणे, संतोष सोनवणे, बबनराव चाटे, भक्ती परदेशी, अंजना दोडके, सीताराम नरके, सुदाम डफळ, राजेश मेमाने, रुपाली सोनावणे, नितीन वेताळ, राजेंद्र ताम्हाणे, प्रकाश वाघमारे, उदय उपाध्ये, खंडू भुकन, निळकंठ चौरे, विशाल सोमवंशी, राजेंद्र डांगरे, कॅमेरामन आकाश, विजया नरके, गायत्री नरके, माधुरी नरके, हरित नरके, डॉ. चारूदत्त नरके, जगदीप वनशिव, दशरथ दुनधव, निकिता जगताप, अश्विनी जगदाळे यांचा समावेश आहे.चित्रिकरणानंतर ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले यांनी माझी बायको माझी मेव्हणी हा लघुपट म्हणजे रसिकांसाठी हास्याची खरी मेजवानी असल्याचे नमूद केले.

हा लघुपट लवकरच रसिक प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, प्रेक्षकांना खळखळून हसवेल, याबाबत चित्रपटाच्या टीममध्ये उत्साहाचेवातावरण आहे.

# अरुणभाऊ झाडे माध्य व उच्च माध्य. विद्यालय येथे चतुसूत्री कार्यक्रमाचे आयोजन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

अरुणभाऊ झाडे माध्य व उच्च माध्य विद्यालय नांदेड येथे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती,जागतिक मादक पदार्थ विरोधी दिन, रस्ता सुरक्षा, एक पेड मा के नाम हे सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहापूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अरुणभाऊ झाडे विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. एल. राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून के डी.मेश्राम , एस. एस. कंकलवार , एस. डी.निमगडे उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे शिक्षक जे. एन. लडके ,व्ही. जी.भागडकर , व्ही. एम.निकुरे ,जे सी. भैसारे ,के बी. कोरांगे , एस. एच. ननावरे ,प्रा. एन. आर. बोरकर , प्रा.एस. बी. बोरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. सर्वप्रथम प्रमुख मार्गदर्शक , अतिथी व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याचा आढावा घेऊन त्यांचे शैक्षणिक विचार याची जाणीव करून दिली. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या के. डी. मेश्राम यांनी अमली पदार्थ म्हणजे काय? अमली पदार्थाचे प्रकार आणि अमली पदार्थाची दुष्परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले एस.डी. निमगडे यांनी रस्ता व सुरक्षा या अंतर्गत रस्त्यावर अपघात होऊ नये म्हणून काय काय उपाययोजना करता येईल याची माहिती दिली. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या एस.एस. कंकलवार यांनी एक पेड माँ के नाम या कार्यक्रमातर्गत जंगलांचा होत चाललेला रास आणि वृक्षारोपण याविषयी माहिती दिली या माध्यमातून प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड घरी लावावे असा संदेश दिला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा व अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक व्ही.जी. भागडकर यांनी केले तर आभार जे.सी. भैसारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दामोदर मसराम, बाजीराव रामटेके, सुरेश भोंडे आणि श्रीमती रेवता इचकापे यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला विद्यार्थी ,विद्यार्थीनी व सर्व शिक्षक उपस्थित होते.



# करमाळा तालुक्यात वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर-१८००हून अधिक वारकऱ्यांनी घेतला लाभ

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुका डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने मौलालीमाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिरास वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. चार दिवस चाललेल्या या आरोग्यसेवा उपक्रमात १८००हून अधिक वारकऱ्यांनी वैद्यकीय तपासणी व औषधोपचारांचा लाभ घेतला.

या उपक्रमाचे आयोजन करमाळा तालुका डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. उमेश जाधव, उपाध्यक्ष डॉ. मनोज काळे आणि डॉ. बालाजी कटके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. तालुक्यातील अनेक खाजगी डॉक्टरांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून दररोज तीन तास सेवा बजावत वारकऱ्यांची वैद्यकीय तपासणी केली व आवश्यकतेनुसार औषधोपचारही उपलब्ध करून दिले.



या मोफत आरोग्य मोहिमेमुळे वारकऱ्यांना प्रवासादरम्यान गरजेच्या वेळी तात्काळ आरोग्य सुविधा सहज उपलब्ध झाल्या. डॉक्टरांच्या या सामाजिक उपक्रमाबद्दल वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. करमाळा तालुका डॉक्टर्स असोसिएशनने आरोग्यसेवेचा प्रसार करण्याच्या उद्देशाने समाजहिताचे उपक्रम भविष्यातही राबवण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

# राज्यात गरीब, दुर्लक्षित समाजावर अन्याय:जयंत पाटील यांचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे. परिणामी, राज्यात गरीब व दुर्लक्षित घटकांवरील अन्याय वाढला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यावरून माजी अर्थमंत्री तथा शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. ते सरकारला धारेवर धरत म्हणाले, सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन राखणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे. सद्यस्थितीत राज्याचे आर्थिक संतुलन पूर्णतः ढासळले आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होत आहे.एसटी, एससी, ओबीसी यांच्यावर होणारा खर्च कागदावर दाखवला जातो हे ३१ मार्चला कळते. पण प्रत्यक्षात त्यावर काहीच पैसा खर्च झाला नाही. तीच पुनरावृत्ती यंदा हे सरकार करत आहे.

जयंत पाटील पुढे म्हणाले, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केल्याचा उल्लेख मी केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्र्यांनी आज पुन्हा पुरवणी मागण्या माडल्या. त्या ५७ हजार ५०९ कोटींच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्यामुळे या मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी कमी पडणार आहेत. पूर्वीच्या व आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक विक्रम रचला आहे. पुरवणी मागण्या मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असा प्रकार या सरकारने सुरू केला आहे.

यापुढे हिवाळी अधिवेशन येणार आहे. त्यानंतर पुढचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी आणखी एक पुरवणी मागणी येणार. याचा अर्थ हे सरकार राज्याची महसुली तूट दीड किंवा २ लाख कोटींपर्यंत पोहोचवेल. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणे बाकी आहे, असे लोक एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. त्यामुळे सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

## दारूवाल्यांनो सावधान..बेहेड आता पेटलंय!

# अवैध दारूविक्रीविरोधात संतप्त जन आंदोलनाचा इशारा;पोलिसांना निवेदन

## बाहेरच्यांनी केली गावाची बदनामी-गावकऱ्यांचा थेट इशारा

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील बेहेड गावामध्ये सध्या अवैध दारूविक्रीच्या विरोधात संतप्त जनतेचा रोष उफाळून आला असून, गावकऱ्यांनी थेट पोलीस ठाण्याचे दरवाजे ठोठावत आपली व्यथा मांडली आहे. गावात बाहेरगावाहून येणाऱ्या दारूप्रेमींचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालला असून, त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. महिलांना शिवीगाळ, तोंडी छळ, आरडाओरड व अश्लील वर्तन सहन करावं लागत असून, सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या या प्रकारांमुळे गावाची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळत आहे. इतकंच नव्हे तर, या वातावरणाचा परिणाम गावातील तरुणांच्या वैवाहिक आयुष्यावर होत



असल्याचेही नागरिकांनी स्पष्ट केले.या पार्श्वभूमीवर बेहेड गावातील तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येत साक्री पोलीस ठाण्याचे निरीक्षक दीपक वळवी यांना निवेदन सादर केले. गावातील बसस्थानक परिसर, मुख्य रस्ते व सार्वजनिक जागा येथे मद्यधुंद अवस्थेत वावरणाऱ्या लोकांकडून निर्माण होणाऱ्या त्रासामुळे ग्रामस्थांमध्ये अस्वस्थता आहे. अवैध दारू, सट्टा, मटका, ताडी यांचे जाळे गावात खुलेआम पसरले असून, यामुळे तरुण पिढी वाईट सवयींच्या आहारी जात असल्याची चिंतेची बाब ग्रामस्थांनी मांडली.पोलीस निरीक्षक वळवी यांनी ग्रामस्थांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले असून, अशा अवैध विक्रेत्यांवर लवकरच कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. मात्र, केवळ पोलिसांची कारवाई पुरेशी नाही, ग्रामस्थांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असा स्पष्ट संदेशही त्यांनी दिला. विशेष म्हणजे, या निवेदनप्रसंगी गावाचे पोलीस पाटील देखील तरुणांसह उपस्थित होते, हे या चळवळीला संस्थात्मक आधार मिळाल्याचे लक्षण मानले जात आहे.

बेहेड गावात सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीचा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरता मर्यादित राहिलेला नसून, आता तो गावाच्या सामाजिक प्रतिष्ठेशी निगडित झाला आहे. त्यामुळे जर लवकरच ठोस उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर गावकऱ्यांचा रोष संतप्त जनआंदोलनात रूपांतरित होईल, हे निश्चित असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# ज्येष्ठ समाजसेवक इमरान राही यांचा गोदावरी मोहिते शिक्षण संस्थेतर्फे सन्मान

## समाजसेवकांनी समाजाभिमुख कार्य करून आदर्श घालावा–मोहन मोहित

**बोरगाव (मेघे) । प्रतिनिधी**

समाजाभिमुख कार्यातून समाजसेवकांनी आदर्श निर्माण करावा, असे मत गोदावरी मोहिते शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहन मोहिते यांनी व्यक्त केले. ते ज्येष्ठ समाजसेवक इमरान राही यांचा सन्मान करताना बोलत होते. हा सन्मान स्पोर्ट शोतोकान कराटे-डो असोसिएशन व 'गोल्डन किड्स कॉन्व्हेंट शाळे'च्या कराटे प्रशिक्षण केंद्राच्या संयुक्त विद्यमाने बोरगाव (मेघे) येथे आयोजित करण्यात आला होता.इमरान राही हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात सक्रीय आहेत. त्यांनी आरोग्य शिबिरे, रक्तदान, नेत्रदान व देहदान जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान, सर्वधर्मसमभाव जागृती, व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे, कराटे प्रशिक्षण, शालेय साहित्य वाटप, वादविवाद व चित्रकला स्पर्धा, तसेच अपंग, अंध, मूकबधिर व वृद्धांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. उन्हाळ्यात पशुपक्षांसाठी पाणपोई लावणे, गरजूंसाठी अन्नधान्य व ब्लँकेट वाटप हे उपक्रम विशेष उल्लेखनीय आहेत.या वेळी मोहन मोहिते म्हणाले, जीवनात काही मोठे मिळवायचे असेल तर ध्येय निश्चित करून त्यासाठी संघर्ष करण्याची तयारी असावी लागते. ईश्वर संघर्षाची संधी त्यांनाच देतो, ज्यांच्यामध्ये ती क्षमता असते. इमरान राही यांचे जीवन संघर्षशील असून ते समाजासाठी एक आदर्श ठरत आहे.

सन्मान समारंभात माजी उपविभागीय अभियंता विजय नाखले, शिहान मंगेश भोंगाडे (राष्ट्रीय अध्यक्ष, स्पोर्ट शोतोकान कराटे-डो असोसिएशन), समाजसेविका पुष्पाताई तपासे व अंकुश गिरडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी मंचावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते इमरान राही यांना शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन कल्याणी भोंगाडे यांनी तर आभार सेन्साई तेजस निवळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रुजान बाघमोरे, भार्गव खेवले, आयुष्यी कुरटकर, नेहा गोल्हार, मानसी गोमासे, कृतिका तपासे, अवंतिका तपासे, प्रतीक कन्नाके, समीर ठाकरे, हंसिका मंडलिक आदींनी विशेष मेहनत घेतली.



# स्वावलंबन: महिलांच्या आत्मनिर्भरतेकडे नेणारी प्रेरणादायी वाटचाल–डॉ.शोभना राधाकृष्ण

**सेवाग्राम । प्रतिनिधी**

येथील 'स्वावलंबन' कौशल्य प्रशिक्षण व स्वावलंबन कार्यक्रमाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ दिनांक ३० जून रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात २५ महिलांना प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा उपक्रम 'दिशा अक्षयधागा प्रकल्पा' अंतर्गत आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राधाकृष्ण फाउंडेशनच्या अध्यक्षा व दिशा संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शोभना राधाकृष्ण होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नामदेव ढोले, संगिता चव्हाण, अर्चना काटेखाये, भारती उगले, वसंत ठेंगे, दिशा संस्थेचे रमेशकुमार आणि दिलीप चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि हारर्पण करून करण्यात आली.





यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शोभना राधाकृष्ण म्हणाल्या, सेवाग्राम-वर्धा ही माझी जन्मभूमी आहे. मी येथे 'नई तालीम' शाळेत शिक्षण घेतले. गावातील वंचित महिलांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडावा, हा माझा ध्यास आहे. या उद्देशाने मार्च २०२५ मध्ये सेवाग्रामच्या जुन्या वस्तीत 'स्वावलंबन' या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

ही संकल्पना अशा शेकडो महिलांसाठी आहे, ज्या घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये अडकलेल्या आहेत; पण आपल्या मुलांना चांगले शिक्षण आणि उज्वल भविष्य देण्याची तीव्र इच्छा मनात बाळगून आहेत. 'स्वावलंबन' कॉम्प्युटर, इंग्रजी, शिलाई, योग, आत्मसंरक्षण आणि समुपदेशन यांसारख्या प्रशिक्षणांद्वारे महिलांना आत्मविश्वास देतो, त्यांना पुढे जाण्याची दिशा दाखवतो.

आमचा उद्देश केवळ कौशल्य देण्यापुरता मर्यादित नाही, तर त्यांच्या चेहऱ्यावर हास्य, मनात शांतता आणि आत्मसन्मान निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मी या महिलांबरोबर शिकत राहीन, त्यांच्यासोबत चालत राहीन आणि त्यांच्या भवितव्यासाठी नव्या शक्यतांचे दरवाजे उघडत राहीन, असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले.या प्रसंगी नामदेव ढोले यांनी, डॉ. शोभना राधाकृष्ण यांचा हेतू अत्यंत प्रेरणादायी आहे. आर्थिक उन्नती महिलांसाठी आवश्यक असून, यामुळेच खरे स्वावलंबन व सक्षमीकरण साध्य होईल, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व परिचय दिलीप चव्हाण यांनी तर प्रास्ताविक व उपक्रमाची माहिती रमेशकुमार यांनी दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकल्प दिशा सोसायटीचे संस्थापक सचिव रवी चोप्रा यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सहभागी महिलांना प्रमाणपत्रे वाटप करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# वर्धा जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक संघाची नव्याने रुजू झालेल्या शिक्षणाधिकाऱ्यांना अभिनंदन भेट



**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने नुकतीच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद वर्धा पदावर नव्याने नियुक्त झालेले डॉ. धर्मपाल कुमरे यांची औपचारिक भेट घेऊन पुष्पगुच्छ देत त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.संघाचे अध्यक्ष रवीबाबू शेंडे व सचिव सुरेशकुमार बरे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांशी शाळा व शिक्षकांच्या विविध समस्या चर्चेसाठी मांडल्या. या वेळी प्रमुख मुद्द्यांमध्ये ३१ मार्चपूर्वी ॲसेसमेंट झालेल्या शाळांना अद्यापही नॉन-सॅलरी अनुदान प्राप्त न होणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या पदांना मान्यता मिळविण्याचा प्रश्न, तसेच सौ. सुनिता चाफले (मुख्याध्यापिका) यांचे समायोजन आणि अन्य अपूर्ण प्रशासकीय कामकाजांचा समावेश होता.

या सर्व समस्यांवर शिक्षणाधिकारी डॉ. धर्मपाल कुमरे यांनी सविस्तर चर्चा करून संघाच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले व योग्य त्या उपाययोजना करून लवकरात लवकर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.या प्रसंगी संघाचे उपाध्यक्ष संजय बावनकर, अरुणा जक्कनवार, छाया भालकर, सुनिता चाफले, कैलास नागरे, यशवंत गडवार आदी पदाधिकारीही उपस्थित होते.

# सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी वैरागडे यांचा ऑटो युनियनच्या वतीने सन्मान



**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा येथील वाहतूक पोलीस विभागात ३२ वर्षे सेवा बजावलेल्या पोलीस शिपाई पुंडलिक वैरागडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त ऑटो युनियन वर्धा तर्फे सन्मान करण्यात आला. बजाज चौकात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.पुंडलिक वैरागडे यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ सेवा बजावताना सर्वसामान्य नागरिक, विशेषतः ऑटोचालकांशी सौहार्दपूर्ण व आपुलकीचे संबंध निर्माण केले. त्यांच्या या सहृदयतेच्या स्वभावामुळेच आजही त्यांच्याबद्दल ऑटोचालकांमध्ये विशेष प्रेमभाव आहे, असे गौरवोद्गार ऑटो युनियनचे अध्यक्ष भास्कर इथापे यांनी यावेळी व्यक्त केले.कार्यक्रमात प्रा. खलील खतीब, पत्रकार शशांक चतारे, तसेच ऑटो युनियनचे चालक-मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन आणि यशस्वीतेसाठी मुल्ला उर्फ सय्यद नूर, फिरोज खान, अजीज शेख, युसूफ शेख, सलीम शेख, किशोर, तरुण, मन्सूर शेख, शकील शेख आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# अभिनव विचार मंचतर्फे भव्य वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन उपक्रम

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

माजी आमदार स्वर्गीय डॉ. रामदास आंबटकर यांच्या जयंतीनिमित्त अभिनव विचार मंच, हिंगणघाटच्या वतीने संत तुकडोजी वार्ड येथील नवनिर्मित योग भवन परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा उपक्रम राबवण्यात आला.यावेळी वड, आंबा, पिंपळ, चिंच, जरुळ, शेंदूर, कडूलिंब यांसारख्या पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमात अभिनव विचार मंचाचे शिलेदार राजेंद्र मोघे तसेच पतंजली महिला योग साधिका शिला रोहनकर व संगीता खेळकर यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. याशिवाय सेवानिवृत्त योगसाधक बाबाराव मस्कर व प्रा. चंद्रकांत सातपुते यांचाही यथोचित गौरव करण्यात आला.



कार्यक्रमात स्व. डॉ. रामदास आंबटकर यांच्या समाजाभिमुख कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. अभिनव विचार मंचाचे अध्यक्ष नितीन सुकळकर व शिलेदार दत्ता भांगे यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा उल्लेख संघटन समर्पित व्यक्तिमत्त्व असा केला. त्यांनी दिलेल्या सामाजिक जाणिवा व समाजाप्रती असलेले उत्तरदायित्व आजही प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले. विशेष म्हणजे, हिंगणघाट शहरात दोन भव्य योग भवनांची निर्मिती हे त्यांचे दूरदृष्टीचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमास अभिनव विचार मंच व पतंजली परिवारचे अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये नितीन सुकळकर, ओमप्रकाश मुडे, विजय धात्रक, विकास नागरकर, शरद वाघमारे, पौर्णिमा धात्रक, छाया सातपुते, रवीला आखाडे, जयंत देवडे, शेखर दाते, महेंद्र पर्वत, रेणुदास नागतोडे, युवराज आडे, अनिल नाईक, विनायक जाधव, किशोर कुंभलकर, बाळू मुंडे, किरण गहेरवार, विलास निखाडे, खेमेकर काका, प्रशांत चौधरी, प्रभाकर कोळसे, परिमल शेंडे, विजय लिचडे, पद्माकर आत्राम, शंकर कुडे, प्रतिभा तेलंग, प्रज्ञा मानकर, लता भोयर, सुरेखा तिजारे, निर्मला निखाडे, माया खडसे, माधुरी चापले, अंजू साबळे, शुभांगी चौधरी, सीमा नक्षीने यांचा समावेश होता. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाबरोबरच सामाजिक बांधिलकीची जाणीवही अधोरेखित झाली. कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल उपस्थितांनी अभिनव विचार मंचाचे आभार मानले.

# भारतीय स्टेट बँकेचा ७० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

देश के साथ सत्तर साल या घोषवाक्याखाली भारतीय स्टेट बँक शाखा सिंदी (रेल्वे) चा ७० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. गेली सात दशके ग्राहकांना अखंड सेवा देत ही शाखा यशाच्या शिखरावर पोहोचली आहे.

या प्रसंगी शाखेच्या व्यवस्थापक पल्लवी हरले, सहव्यवस्थापक सूचित भिवगडे, रोखपाल तुषार वानखेडे, कर्मचारी प्रवीण कोसारे, अक्षय भगत, किशोर गोल्हर, सागर भगत, ज्ञानेश्वर अवचट, माधुरी कातोरे, अर्चना झाडे, शेंद्रे , उज्वला टेंभरे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात बँकेच्या कार्यप्रणालीचा आढावा घेण्यात आला तसेच ग्राहकांसाठी चालविण्यात येणाऱ्या सुविधा व नव्या योजना यांबाबत माहिती देण्यात आली. ग्राहक सेवा हीच आमची प्राथमिकता असून सामाजिक बांधिलकी जपत बँकिंग सेवा अधिक प्रभावीपणे देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.





# दहेगाव (गोसावी) येथे लालपरीचे जल्लोषात स्वागत



**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

तालुक्यातील दहेगाव (गोसावी) गावात अखेर महामंडळाची बससेवा सुरू झाली असून, १ जुलै रोजी सकाळी ६ वाजता या सेवेला औपचारिक प्रारंभ झाला. बसगाडी आगमनाच्या वेळी ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने पूजाअर्चा केली. बसला अक्षता, फुलांची माळ व नारळ अर्पण करण्यात आला. तसेच चालक व वाहक यांचा शाल, श्रीफळ व गुलदस्त्याने सत्कार करण्यात आला.

दहेगाव (गोसावी) परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून एसटी बससेवेचा अभाव होता. परिणामी, स्थानिकांना प्रवासासाठी खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे प्रवाशांना आर्थिक भार आणि गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या समस्येच्या पार्श्वभूमीवर आमदार समीर कुणावार यांच्या प्रयत्नातून अखेर दहेगाव गावात एसटीची बस सेवा उपलब्ध झाली आहे. ही बस दररोज सकाळी ६ वाजता दहेगाव (गोसावी) येथून सुटेल आणि संध्याकाळी ७ वाजता हिंगणघाट येथून परत येईल. या सेवेमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना, नोकरदारांना आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या शुभप्रसंगी झालेल्या स्वागत समारंभात विलास कोकोटे, भाजप शक्ती प्रमुख उमेश राऊत, बूथ प्रमुख सचिन महाबुधे, भाजप सोशल मीडिया प्रमुख संजय पिसुडडे, समाजसेवक विजय कांबळे, ज्ञानेश्वर किरणाके, घनशाम अतकरे, अशोक अतकरे, निलेश बाईलबोडे, गोपाल पोहटे, अनिल तिजारे, सतिश इंगळे आदी ग्रामस्थ व एसटीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या पुलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचा ठराव

**पुलगाव । प्रतिनिधी**

निसर्गावर अवलंबून असलेल्या शेती व्यवसाय अस्मानी व सुलतानी संकटात आहे. शेतकरी आर्थिक संकटात असून तो आर्थिक विवंचनेत सापडला आहे. त्यांना आधार देण्यासाठी कर्जमाफी करून शासनाने तात्काळ सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा अशी मागणी बाजार समितीचे सभापती मनोज वसु यांनी केली व त्यास उपसभापति संजय कामनापुरे यांनी अनुमोदन दिले व उपस्थित सर्व सदस्यांनी त्यास सहमति दर्शवून सादर निवेदन शासनास शक्य तितक्या लवकर पाठवन्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

कृषी उत्पन्न बाजार समिती पुलगावच्या



संचालक मंडळाची सभा आज दि. ३० जुन २५ ला पार पडली. या सभेमध्ये निसर्गातील बदलत्या वातावरणामुळे शेतकऱ्यांवर अस्मानी संकट कोसळलेले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांची काळजी करणारी संस्था असून त्यांच्यावर आलेल्या संकटाच्या वेळी धावून जाणे हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्तव्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी व त्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज वसु यांनी केली व सर्व संचालक मंडळांनी त्याला पाठिंबा दिला. ठरावाचे निवेदन शासनाकडे पाठविण्याचे ठरवण्यात आले. संचालक मंडळाचे सभा झाल्यानंतर सर्व संचालकांनी तहसील कार्यालयात जाऊन अप्पर तहसीलदार स्नेहा क्षिरसागर यांना निवेदन दिले. यावेळी सभापती मनोजबाबू वसु, उपसभापती संजयबाबू, कामनापुरे,अरविंद वानखडे, संजय बोबडे, प्रमोद वंजारी,मनिष खडसे,संजय गावंडे,रविंद्र चौधरी,अश्विनी अडकिने, मंजुषाताई भानखेडे, अमर तिनघसे,अरुण लाहोरे, जयकुमार वाकडे, अशोक आठबैले,मिलींद ठोंबरे,बहादुर चौधरी,अनिल नाहाटा,हरिषकुमार ओझा उपस्थित होते.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

# अकलूजमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने उत्साही स्वागत; रिंगण सोहळा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

**सोलापूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील सराटी गावातून प्रस्थान करून जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी आज सोलापूर जिल्ह्यात दाखल झाली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालखीचे भक्तिभावाने स्वागत करत दर्शन घेतले. या वेळी पंढरीची वाट भगवंताच्या नामघोषाने भक्तिमय झाली होती.सकाळी ८.३५ वाजता पालखीचा अकलूज येथे नीरा नदी पार करून प्रवेश झाला. यावेळी रथावर पुष्पवृष्टी करण्यात आली. पोलीस विभागाच्या बँड पथकाने गजर करत पालखीचे स्वागत केले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते संत तुकाराम महाराजांच्या अश्व व पादुकांचे पूजन करण्यात आले.पालखीच्या स्वागतस्थळावरून रथाचे सारथ्य स्वतः जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, उपविभागीय अधिकारी अमित माळी,







तहसीलदार सुरेश शेजूल, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांची उपस्थिती होती.

पालखी मार्गावर उभारलेल्या हिरकणी कक्ष, वैद्यकीय सेवा केंद्रे आणि तात्पुरत्या आरोग्य सुविधा केंद्रांना जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देत व्यवस्था तपासून पाहिली. वारकऱ्यांना उत्तम आरोग्य सेवा देणे हे आपले कर्तव्य आहे, असे ते म्हणाले.

अकलूज नगरपरिषदेतर्फे गांधी चौकात पालखीचे औक्षण व स्वागत करण्यात आले. अकलूजच्या नागरिकांनी पालखी मार्गाच्या दोन्ही बाजूंनी रांग लावून दर्शन घेतले व पुष्पवृष्टी करत आपल्या श्रद्धेचा ठसा उमटवला.सोलापूर जिल्ह्यातील पहिला गोल रिंगण सोहळा अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. पताका, तुळशी वृंद, हांडे, टाळ–मृदंगाच्या गजरात भाविक हरिपाठ करत नृत्य करत होते. या रिंगण सोहळ्यात आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांचे सुपुत्र विश्वतेज मोहिते यांनी सपत्नीक अश्व पूजन केले. अश्वाचे रिंगणी धावणे हे अकलूजकरांसाठी एक भक्तिपर्वच ठरले.खासदार धैर्यशील मोहिते पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, तहसीलदार सुरेश शेजूल, उपविभागीय अधिकारी अमित माळी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, विद्यापीठ कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर आणि विविध धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# मांडवगण फराट्याच्या राणीचे अमेरिकेवर 'राज'!

## घरगुती चव पोहचली थेट कॅलिफोर्नियात

**शिरूर । रमेश बनसोडे**

मांडवगण फराटा (ता. शिरूर, जि. पुणे) येथील प्रगतशील शेतकरी राजेंद्र फराटे यांच्या पत्नी राणी फराटे यांनी सुरू केलेला राजा–राणी गृह उद्योग हा स्त्रीशक्तीचा प्रेरणादायक नमुना ठरत आहे. त्यांच्या हस्तकौशल्यातून तयार होणाऱ्या घरगुती पारंपरिक चविष्ट खाद्यपदार्थांची चव आता थेट अमेरिकेतील कॅलिफोर्नियापर्यंत पोहोचली आहे.राणीताईंनी तयार केलेले लाडू, करंजी, चिवडा, शेवई, पापड यांसारखे विविध पारंपरिक खाद्यपदार्थ सुसज्ज पॅकिंगसह कॅलिफोर्नियातील रेडवुड सिटी व सनीवेल येथे सागर ताकवणे यांना पाठवण्यात आले आहेत. ही निर्यात संगिता ताकवणे यांच्या पुढाकाराने साकारली गेली असून, त्यामुळे महाराष्ट्रातील चव अमेरिकन बाजारपेठेत पोहोचली आहे.



राणीताईंनी हा गृहउद्योग आपल्या पती राजेंद्र फराटे यांच्या प्रोत्साहनाने सुरू केला. गृहिणीच्या भूमिकेतून उद्योजिकेपर्यंतचा त्यांचा प्रवास आता अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या हस्तकौशल्याला महाराष्ट्रासह इतर राज्यांमधून भरघोस प्रतिसाद मिळत असून, लग्नसमारंभ, पारंपरिक कार्यक्रम व दैनंदिन गरजांसाठी ग्राहकांकडून ऑर्डरद्वारे मागणी केली जात आहे.

> **"भारतीय घरगुती चव आता परदेशातही लोकप्रिय होत आहे. सागर ताकवणे यांच्या माध्यमातून ही चव अमेरिकन लोकांच्या ताटात पोहोचत आहे, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे,**
> **– संगिता ताकवणे, सनीवेल**

### परदेशी ऑर्डरसाठी सज्ज उद्योग

**'राजा–राणी गृह उद्योग' आता परदेशी मागणीसाठीही सज्ज झाला असून, भविष्यात अमेरिकेशिवाय अन्य देशांतही उत्पादन पोहोचवण्याचा मानस आहे. राणीताईंचा हा प्रवास दाखवतो की घरगुती कौशल्य हे जागतिक व्यासपीठावरही नावलौकिक मिळवू शकते.**

### प्रेरणा घ्या, पावले उचला

**जर तुम्हालाही राणीताईंप्रमाणे उद्योजिका व्हायचे असेल, तर त्यांच्या प्रवासातून प्रेरणा घ्या. उत्कृष्ट चव, प्रामाणिक मेहनत आणि सातत्य या त्रिसूत्रीच्या जोरावर घरबसल्या संधी निर्माण करता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे.**

# खैरगावमध्ये बियाणे प्रक्रियेचे महत्त्व स्थानिक शेतकऱ्यांसाठी प्रभावी मार्गदर्शन

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा येथील अंतिम वर्षाच्या कृषीविद्यार्थिनींनी वरोरा तालुक्यातील खैरगाव या गावात बियाणे प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर करून शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती दिली. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये बियाणे प्रक्रियेबाबत जागरूकता वाढली असून अनेक शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात ती पद्धत त्वरित अवलंबली आहे.या प्रात्यक्षिक उपक्रमात कृषी विद्यार्थिनी प्राजक्ता रामटेके, श्रुती राऊत, श्रद्धा आत्राम, दिशा भगत, नोमीका बारसागडे, संस्कृती बाराब्दे आणि प्रणाली बेद्रे यांनी सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी कार्यक्रमात सर्वप्रथम बियाणे प्रक्रियेचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, पेरणीपूर्वी बियाणे प्रक्रिया केल्यास बुरशीजन्य आणि किडीजन्य रोगांपासून पिकांचे संरक्षण होते. विशेषतः सोयाबीन पिकात आढळणाऱ्या खोडमाशी, मुळे कुजणे, करपा, फुलेकरपा आणि विषाणूजन्य रोगांपासून संरक्षणासाठी बीज प्रक्रिया अत्यंत आवश्यक आहे.

विद्यार्थिनींनी सोयाबीनच्या बियाण्यावर रासायनिक व जैविक प्रक्रिया कशी करावी याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. यामध्ये रायझोबियम आणि ट्रायकोडर्मा या जैविक घटकांचा वापर करण्यात आला. बीज प्रक्रिया करताना बुरशीनाशक व कीटकनाशक योग्य प्रमाणात वापरण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले. अधिक प्रमाणात वापरल्यास होणारे नुकसानही त्यांनी शेतकऱ्यांना समजावून



सांगितले.

बीज प्रक्रिया पेरणीपूर्वी किती वेळ आधी करावी आणि प्रक्रियेनंतर किती वेळात पेरणी करावी, याविषयीही स्पष्ट मार्गदर्शन करण्यात आले. बीज प्रक्रियेमुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते, उत्पादनात वाढ होते आणि फवारणीवरील खर्च कमी करता येतो, असे विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना सांगितले.या उपक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून खैरगाव येथील हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. यामध्ये कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, ग्रामीण कृषी कार्यानुभव प्रभारी डॉ. आर. व्ही. महाजन, कार्यक्रम समन्वयक राहुल तायडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सतीश इमडे, तसेच विषयतज्ज्ञ डॉ. पी. के. आकोटकर, डॉ. मनोज जोगी आणि अश्विनी मानकर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थिनींच्या या शास्त्रीय माहितीवर आधारित उपक्रमामुळे खैरगावमधील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी पद्धतींचे ज्ञान मिळाले असून, त्यांनीही आपल्या शेतीत त्या तंत्राचा अवलंब सुरू केल्याचे समाधान व्यक्त केले.

# स्थानिकांना रोजगारासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागणीला यश जिल्हास्तरीय आढावा बैठक २ जुलैला

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या स्थानिकांना रोजगार देण्याच्या धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात अखेर दीड वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जिल्हास्तरीय आढावा समितीची बैठक येत्या २ जुलै २०२५ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात होणार आहे. ही बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या पाठपुराव्याला यामुळे यश आले आहे.

स्थानिक युवकांना रोजगार मिळावा यासाठी नितीन भटारकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपूर येथील हैदराबाद भवन येथील विशेष कार्य अधिकारी आशा पठाण यांची भेट घेऊन मागणी केली होती. त्याचप्रमाणे त्यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनाही लेखी निवेदन देऊन सदर विषयाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी केली होती.

महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ नोव्हेंबर १९६८ रोजी स्थानिकांना रोजगारात ८० टक्के आरक्षण देण्याचे धोरण जाहीर केले होते. त्यानंतर वेळोवेळी सुधारणा करत दिनांक १७ नोव्हेंबर २००८ रोजी सुधारित आदेश काढण्यात आला. या आदेशानुसार सर्व खाजगी उद्योगांनी स्थानिकांना किती रोजगार उपलब्ध करून दिला याचा तपशील दर तीन महिन्यांनी जिल्हा उद्योग केंद्राकडे प्रतिज्ञापत्राच्या स्वरूपात सादर करणे बंधनकारक आहे.मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील बहुतांश उद्योगांकडून या आदेशाला केराची टोपली दाखवली जात असून, काहींनी बनावट व दिशाभूल करणाऱ्या नोंदीसह प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. जिल्ह्यातील अनेक उद्योगांतून बाहेरच्या राज्यांतील व्यक्तींना भरती करून स्थानिकांना डावलण्यात येत असल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. त्यामुळेच स्थानिक तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.या धोरणाचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्यात आली असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दर तीन महिन्यांनी बैठक घेणे बंधनकारक आहे. मात्र माहितीचा अधिकार कायद्यानुसार मिळालेल्या माहितीनुसार चंद्रपूर जिल्ह्यात मागील बैठक ८ सप्टेंबर २०२३ रोजी झाली होती. त्यानंतर आजतागायत एकही बैठक झाली नव्हती.

या बैठकीत स्थानिकांना रोजगार न देणाऱ्या उद्योगांवर कारवाईचा ठराव केला जाऊ शकतो. शासनाने केलेल्या आदेशानुसार उद्योगांनी त्यांच्या भरती विभागात मराठी भाषेचे ज्ञान असणाऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक करणेही बंधनकारक आहे. पण अनेक ठिकाणी या नियमाचाही फज्जा उडवला जात असल्याचे दिसून आले आहे.

अखेर राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रयत्नांना यश येत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याबाबत जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक तथा उद्योग उपसंचालक यांनी लेखी पत्राद्वारे सर्व सदस्यांना व नितीन भटारकर यांना आमंत्रित केले आहे. यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या दृष्टीने आशेचा किरण निर्माण झाला आहे. जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# सरकाला बहुमत, पण रस्त्यावर आपली सत्ता उद्धव ठाकरे यांचा जनसुरक्षा विधेयकाला विरोध

**मुंबई (वृत्तसंस्था)**–हिंदीच्या सक्तीवरून सरकारला माघार घेण्यास भाग पाडणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आता सरकारच्या जनसुरक्षा विधेयकाला कडाडून विरोध करण्याचे संकेत दिलेत. सरकारने पहलगाम हल्ल्यानंतर जनसुरक्षा विधेयक आणले आहे. पण या विधेयकाच्या माध्यमातून सरकार आपल्या राजकीय विरोधकांना तुरुंगात डांबण्याची स्वप्ने पाहत आहे, असे ते म्हणालेत. पहलगामचे अतिरेकी कुठे गेले? ते भाजपत गेले का? पाहा. या सरकारला सभागृहात बहुमत आहे, पण रस्त्यावर आपली सत्ता आहे, असा टोलाही त्यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला हाणला

मुंबईतील आझाद मैदानावर माकपने जनसुरक्षा विधेयकाविरोधात धरणे आंदोलन सुरू केले आहे. उद्धव ठाकरे यांनी सोमवारी या आंदोलनस्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी जनसुरक्षा विधेयकाच्या माध्यमातून सरकार विरोधकांना तुरुंगात डांबण्याची स्वप्ने पाहत असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, जम्मू काश्मीरच्या पहलगाम येते अतिरेकी हल्ला झाला. त्यानंतर आत्ता सरकार जनसुरक्षा विधेयक आणत आहे. पण सरकार या विधेयकाच्या माध्यमातून आपल्या राजकीय विरोधकांना तुरुंगात डांबण्याचे स्वप्न पाहत आहे. त्यांनी पहिल्यांदा पहलगामचे अतिरेकी कुठे पळून गेले? हे सांगावे.



भाजप जाणारे सर्वच साधू–संत होतात. मग अतिरेकी कुठे गेले? ते भाजपत गेले का? कारण भाजपत गेले की सर्वकाही माफ होते. ही सत्तेची मस्ती आम्ही चालू देणार नाही. ते आणीबाणीच्या काळातील काळ्या आठवणी सांगत आहेत. पण देशात मागील १० वर्षांपासून अघोषित आणीबाणी आहे. त्याचे काय? त्या विरोधात कोण लढणार? तुम्ही लढणार असाल तर शिवसेना तुमच्यासोबत आहे. त्याच्याकडे पाशवी बहुमत आहे. ते विधेयक आणू इच्छित आहेत. सभागृहात त्यांच्याकडे बहुमत आहे, पण रस्त्यावर आपली सत्ता आहे, असे उद्धव ठाकरे या प्रकरणी सरकारला निर्वाणीचा इशारा देताना म्हणाले. ते पुढे म्हणाले, काल आपण सरकारला मोठा दणका दिला. ते हिंदीची सक्ती करत होते. आमचा हिंदी भाषेला विरोध नाही. पण आम्ही तिची सक्ती कुणाच्या माथी मारू देणार नाही. त्यामुळे आम्ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सरकारच्या जीआरची होळी केली. त्यानंतर आता जनसुरक्षा विधेयक आणून तुम्ही आपल्या राजकीय विरोधकांना नक्षलवादी ठरवण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही त्याला विरोध केल्याशिवाय राहणार नाही. सरकारने राजकीय विरोधकांना नक्षलवादी ठरवण्याचा पाप करू नये. हे विधेयक एक तर आणू नका आणि आणले तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये या विधेयकाला आम्ही विरोध केल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही सत्तांध जरूर असाल, पण हत्ती मदांध झाल्यानंतर माहूत जसा त्याला अंकुश लावतो. तसा अंकुश हा महाराष्ट्र सत्तांध झालेल्या भाजपला लावल्याशिवाय राहणार नाही. सरकारने दडपशाही केली तर तुरुंग कमी पडतील. तुम्ही आमचा आवाज दाबू शकणार नाही. हिंदी सक्तीच्या विरोधात मराठी माणूस पक्षभेद विसरून एकत्र आला. सरकारला गुडघ्यावर आणले. आता हे विधेयक आणले तर सगळ्या पक्षांनी आणि महाराष्ट्रातल्या तमाम जनतेनी एकत्र येऊन या सरकारला गुडघ्यावर आणावे लागेल, असे ते म्हणाले.जो कुणी भाजप व सरकारविरोधात बोलेल तो देशद्रोही असे या सरकारला वाटते. स्वातंत्र्य लढ्याशी यांचा कोणताही संबंध नव्हता. आताही या लोकांना आपण कसे निवडून आलो हे माहिती नाही. हे लोकसभेला ४०० पार करायला निघाले होते. पण महाराष्ट्रात आपण सर्वांनी त्यांचे उधळलेले गाढव रोखले. पण विधानसभेला त्यांनी अशा काय चाली खेळल्या की ६ महिन्यांत होत्याचे नव्हते झाले. आपल्याला हा धक्का होता. हे असे कसे झाले? असा प्रश्न आपल्याला पडला. मला कल्पना आहे की आपण सगळेजण महाविकास आघाडीच्या सोबत होतात. आमच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून आपण सुद्धा प्रचार केला होता आणि हेच त्यांच्या डोळ्यामध्ये खुपत आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .